# राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

## आरोग्य विभाग सो.म.पा

**डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक आप्पासाहेब वारद पथ**
**रेल्वे लाईन सोलापूर ४१३००१**

---

**जा.क्र./आ.अ/NUHMभरती./93** **सोलापूर दिनांक: ३०/०५/२०२३**

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) आरोग्य विभाग सोलापूर महानगरपालिका सोलापूर येथून सोलापूर शहरातील विविध आरोग्य केंद्रास्तरावर राबविण्यात येत असलेल्या विविध योजनाकरीता ०९ संवर्गातील ४९ पदांची कंत्राटी पध्दतीने करार तत्वावर पदभरती करणेकामी दि. २९/०४/२०२३ रोजी दै. वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती.

उपरोक्त ०९ संवर्गापैकी ०५ विविध प्रकारच्या वैद्यकिय अधिकारी यांची मुलाखत दि. १८/०५/२०२३ रोजी ११.०० वाजता स्थायी समिती सभागृह बैठक कक्षामध्ये घेण्यात आलेली होती. त्याची निवड यादी सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

उपरोक्त जाहिरातीमधील लॅबटेक्निशिएन या पदाची बिंदू नामावलीमध्ये सुधारणा झालेली असल्याने लॅबटेक्निशिएन पदाची भरती प्रक्रिया रद्द करण्यात आलेली आहे.

उर्वरीत संवर्गापैकी फार्मासिस्ट, जी.एन.एम. व ए.एन.एम यांची गुणानुक्रमे तक्ता तयार करुन त्याबाबतची प्राथमिक स्वरुपाची निवड यादी सोलापूर महानगरपालिकेच्या www.solapurcorporation.gov.in या संकेतस्थळावर दि. ३०/०५/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात येईल असे १६/०५/२०२३ रोजी सोलापूर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दकरण्यात आलेले होते. फार्मासिस्ट, जी.एन.एम. व ए.एन.एम या पदांच्या उमेदावाराने शैक्षणिक अर्हता ज्या दिनांकास पुर्ण केलेली आहे, त्या दिनांका नंतरचा फार्मासिस्ट, जी.एन.एम. व ए.एन.एम पदांचा कामाचा अनुभव हा ग्राहय धरण्यात आलेला आहे. सदर पदांकरिता खालील तत्क्यात नमूद पध्दतीनूसार अर्जांची छाननी प्रक्रिया राबविण्यात आलेली आहे.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exm मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे proporation काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे proporation = ६०*५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतापेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबधित विषयामध्येच असल्यास विचारात घ्यावी) | अधिकतम २० गुण द्यावेत मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे proporation काढावे. (उदा.१ Staff करुन अतिरिक्त B.sc (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारास B.sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे proporation = ६०*२०/१००=१२ गुण | २० गुण |
| संबधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरीता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण) | ३० गुण |
| | | एकूण १०० गुण |

आज रोजी www.solapurcorporation.gov.in संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली फार्मासिस्ट, जी.एन.एम. व ए.एन.एम या पदांची गुणानुक्रमे यादी हि प्राथमिक स्वरुपाची आहे. ज्या उमेदवारांना त्यांची शैक्षणिक पात्रता, अनुभव, व अतिरिक्त शैक्षिणिक अर्हता इत्यादीबाबत काही हरकत नोंदवायची असल्यास त्यांनी दि. ३१/०५/२०२३ ते ०२/०६/२०२३ या तारखेपर्यंत कार्यालयीन वेळेत सदर पदाच्या उमेदवारांनी हरकती व सुचना लेखी स्वरुपात सादर करावयाच्या आहेत. दि. ०२/०६/२०२३ रोजीच्या कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनां ग्राहय धरल्या जाणार नाहीत. सदर हरकती व सुचनांचे निराकरणा अंती, गुणानुक्रमे अंतीम निवड यादी प्रसिध्द करण्याबाबतची तारीख सोलापूर महानगर पालिकेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(डॉ. अतिश बोराडे)
शहर कार्यक्रम व्यवस्थापक
राष्ट्रीय आरोग्य अभियान

(डॉ. बसवराज लोहारे) 30/05/2023
आरोग्याधिकारी तथा सदस्य सचिव
निवड समिती राष्ट्रीय आरोग्य अभियान

30.05.23
(पुष्पगंधा भगत)
सहाय्यक आयुक्त सा.प्र.विभाग
सोलापूर महानगरपालिका

# सोलापूर महानगर पालिका

**फार्मासिस्ट, जी.एन.एम. व ए.एन.एम या पदांच्या उमेदवारांनी हरकती व सूचना नोंदविण्याबाबतचा नमुना**

**उमेदवाराचे नाव : -**

**पदाचे नाव :-**

**अर्जात नमुद संपर्क क्रं : -**

**अर्जात नमुद जात प्रवर्ग : -**

**अर्ज क्रमांक : -**

| अ. क्र. | हरकत व सूचना | तपशील |
|---|---|---|
| १ | शैक्षणिक पात्रता | |
| २ | अनुभव | |
| ३ | अतिरिक्त शैक्षणिक अर्हता | |
| ४ | इतर | |

**सोबत जोडलेली कागद पत्रे : -**

१.          २.

३.          ४.

**उमेदवाराची स्वाक्षरी**

**दिनांक :-**